नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/02/2024 (शनिवार) दुपार

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २३/०२/२०२४ चे २०.१० वा. दरम्यान पोलीस स्टेशन केळवद हद्दीत पो.स्टे केळवद येथील स्टाफ व उपविभागिय पोलीस अधिकारी स्टॉफसह पो.स्टे केळवद हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मुखबिरद्वारे खबर मिळालेल्या खबरे वरुन मौजा कवठा शिवारातील पादरी खापा (म. प्र.) येथुन येणाऱ्या पांधन रोडवर अवैध्यरित्या विनापरवाना रेती लोड करुन वाहुतक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमी वरून मौजा हत्तीसर्रा शिवार कवठा येथे नाकाबंदी करून **आरोपी नामे– १)प्रफुल भोजराज ढोबळे, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१ केळवद ता. सावनेर २) संजय गुंडेराव शिवनकर, वय ३८ वर्ष वार्ड क्र. ०२ केळवद ता. सावनेर ३) पाहीजे आरोपी रोशन बांबल रा. हत्तीसर्रा** यांनी आपापले ताब्यातील १) महींद्रा ट्रक्टर विना क्रमांकाचा व ट्रॉली लाल रंगाची विना क्रमांकाची किंमती ६,००,०००/– रू तसेच २) महींद्रा ट्रॅक्टर विना क्रमांकाचा व ट्रॉली लालरंगाची विना क्रमांकाची किमती ६,००,०००/–रू दोन्ही ट्रक्टर ट्रॉली मध्ये ०२ ब्रास रेती किंमती १०,०००/–रू अवैध्यरित्या विनापरवाना शासकीय संपत्तीची रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून दोन महिंद्रा ट्रॅक्टर विना क्रमांकाचे व दोन ट्रॉली लाल रंगाची विना क्रमांकाची ट्रॉली मध्ये प्रत्येकी एक एक ब्रास रेती प्रती ब्रास रेती ५०००/– रु. प्रमाणे १०,०००/– रुपये प्रति ट्रॅक्टर किंमती ६,००,०००/–रुपये प्रमाणे १२,००,०००/–रुपये असा एकुण किंमती १२,१०,०००/– रुपयाची रेती (गौनखनीज) विनापरवाना शासकीय संपत्तीची चोरी करून वाहतुक करतांना मिळन आल्याने सदर आरोपींविरुद्ध कलम ३७९, १०९ भा.द.वी सहकलम ४८ (८) जमिन महसुल अधिनियम १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के, सपोनि साखरकर, पोहवा दिनेश काकडे, पोलीस अंमलदार नितेश पुसाम, धोंडुतात्या देवकते यांनी केली.



<u>**जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद**</u>

<u>**नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई**</u>

दिनांक २३/०२/२०२४ रोजी २२/५० वाजता पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ पोस्टे समोर नाकाबंदी करीत असताना मुखबिरद्वारे खबर मिळालेल्या खबरे वरुन काळया रंगाची स्कोडा कार क्र एम.एच–०४ सी.एम.–६८४९ ही येताना दिसली तिला नाकाबंदीचे ठिकाणी थांबविण्याचा ईशारा केला असता सदर कार चालकाने आपले ताब्यातील स्कोडा कार ही रिव्हस घेउन पलटवुन कवठा गावचे रोडने पळुन लागला तिचा सरकारी वाहनाने पाठलाग केला असता स्कोडा कार चालकाने आपल्या ताब्यातील कार ही कवठा शिवारात थांबवुन सोडुन अंधाराचा फायदा घेउन पळुन गेला सदर कारची पाहणी केली असता सदर कार मध्ये ५ नग जिवंत कालवड गाई गौवंश किंमती ५०,०००/– रु व २ नग मोठ्या गाई गौवंश किंमती ४०,०००/– रुपये व रंगाची स्कोडा कार क्र एम.एच–०४ सी.एम.–६८४९ किंमती ७,००,०००/– रुपये असा एकुण किंमती ७,९०,०००/– रुपयाच्या जनावरांना अत्यंत क्रूर व निर्यदयतेने वाहनात डांबुन आखुड दोरीने पाय व तोंड बांधुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुऱ्या जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैद्यरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदर स्कोडा कार क्र एम. एच–०४/सी.एम.–६८४९ चा चालका विरुद्ध पो.स्टे ला कलम–२७९ भा.द.वी सहकलम ११ (१)(घ)

(ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागविने प्रतिबंधक अधिनियम १९६० सहकलम– ५ (अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सहकलम–११९ म.पो.का. सहकलम १८४ मो. वा. का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार सपोनि. राकेश साखरकर, पोहवा दिनेश काकडे, मंगेश धारपुरे, पोशि धोंडुतात्या देवकते, श्रीधर कुलकर्णी यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर